**गोपनीय / अतितात्काळ**

क्र. पोमसं/२/१०२०/निनिसू/२०१५-१६/५०/२०१६
पोलीस महासंचालक यांचे कार्यालय
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहीद भगत सिंग मार्ग, कुलाबा, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- १०/ ०३ /२०१७

**संदर्भ :-** शासन आदेश, गृह विभाग, क्र. रापोसे-१७१७/प्र. क्र. ४२/पोल-१(अ), दिनांक १०/०३/२०१७ (प्रत सलग्न)

**विषय:-** पोलीस उप अधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) पदावरील बदलीबाबतचे शासन आदेश कळविण्याबाबत.

----०००----

पोलीस उपअधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गातील पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१५-१६ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या श्रीमती अस्मिता आशिष भोसले यांना शासन आदेश, गृहविभाग, क्र. रापोसे ०११६/प्र.क्र. १८९ (१) पोल १अ, दिनांक ०१.१०.२०१६ अन्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली होती. सदरची पदस्थापना रद्द करून त्यांना सा.प्र.वि., दिनांक २८.४.२०१५ व दिनांक १६.७.२०१५ च्या अधिसुचनेतील तरतुदीनुसार महसुली विभागीय संवर्ग वाटप करण्यात येवून त्यांना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सुधारित पदस्थापना देण्यात येत असल्याचे संदर्भाधिन शासन आदेशान्वये कळविले आहे. :-

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नांव | सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती अस्मिता आशिष भोसले | पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर (बदली आदेशाधिन) | सहायक पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई |

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

**अ.** संदर्भाधिन शासन आदेशांच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी, व तसा अनुपालन अहवाल सत्वर या कार्यालयास सादर करावा.

**आ.** बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणांसंदर्भात मा.न्यायालयाचे, अथवा मा. न्यायाधिकरणाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन पुढील कार्यवाही करावी.

**इ.** सदर आदेशांची प्रत, तसेच बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त करण्याच्या आदेशांची प्रत संबंधीत अधिका-यांना **व्यक्तिश:** अदा करुन ती त्यांना प्राप्त झाल्याबाबत त्यांची दिनांकासहित स्वाक्षरी घ्यावी, व ती पोच या कार्यालयास पाठवावी.

ई. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यास बदलीवर **तात्काळ** कार्यमुक्त करून त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या पदावर तातडीने हजर होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करून अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

उ. उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने संबंधीत अधिका-यास त्यांच्या बदलीवरील नवीन नियुक्तीच्या ठिकाणी कार्यमुक्त केल्याची, तसेच ते नवीन नियुक्तीच्या ठिकाणी रुजू झाल्याची तारीख तात्काळ या कार्यालयास कळवावी. तसेच, ते जर बदलीवर नवीन नियुक्तीच्या ठिकाणी हजर झाले नाहीत, तर तसे या कार्यालयास कळवावे, आणि त्यांच्याविरुध्द या कार्यालयाच्या क्र. २/५५०७, दिनांक १६/९/८३, ११/१/८४ व दि. १०/२/९१ तसेच क्र. पोमसं /३/ ५५०७/६/९७, दिनांक १३/२/९७ च्या परिपत्रकांतील सूचनांप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

**(राजकुमार व्हटकर)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, नागपूर

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग,दुसरा मजला, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२
( **लक्षवेध :- श्री. प्र. मो बलकवडे,** कक्ष अधिकारी)

प्रत सस्नेह :-

महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर

प्रत :-

पोलीस अधीक्षक, राज्य पोलीस नियंत्रण कक्ष, मुंबई
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, १४-अ, ३६, ४०,

<u>निवडसूची सन २०१५-१६</u>
राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना.....

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

शासन आदेश क्र.रापोसे-२२१६/प्र.क्र.३८७/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १० मार्च, २०१७.

**वाचा :-** (१) शासन आदेश क्र.रापोसे-०११६/प्र.क्र.१८९(१)/पोल-१(अ), दि.०१.१०.२०१६,
(२) पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांनी चक्रीय पध्दतीने केलेली शिफारस.

**<u>शासन आदेश</u> :-**

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील पदांवर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१५-१६ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक संवर्गातील खालील अधिकाऱ्यास शासनाच्या संदर्भाधीन दि.०१.१०.२०१६ च्या आदेशान्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली होती. त्यांची सदर पदस्थापना रद्द करून, त्यांना "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५" संदर्भातील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२८.०४.२०१५ आणि दि.१६.०७.२०१५ रोजींच्या अधिसूचनेतील तरतुदींनुसार, खालील अधिकाऱ्यास महसुली विभागीय संवर्गाचे वाटप करण्यात आले आहे. सदर महसुली विभाग वाटपानुसार खालील अधिकाऱ्यास त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सुधारित पदस्थापना देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नांव | नि:शस्त्र पोलीस निरीक्षक या पदावरील नियुक्तीचे ठिकाण | नवीन नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती अस्मिता आशिष भोसले | बृहन्मुंबई | सहायक पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई. |

२. पदोन्नती देण्यात आलेल्या, उपरोक्त अधिकाऱ्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित किंवा प्रस्तावित असल्यास, उपरोक्त अधिकाऱ्याविरूध्द सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २.०४.१९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार त्यांच्याविरूध्द प्रलंबित किंवा प्रस्तावित विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीच्या / न्यायालयीन कार्यवाहीच्या अधीन राहून, त्यांना तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात येत आहे. त्यांच्याविरूध्द प्रलंबित किंवा प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक

चौकशीअंती होणारी शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना वरीलप्रमाणे पदोन्नतीने पदस्थापना देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र. २७९७/२०१५ मधील अंतिम निर्णयाच्या तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. पदोन्नतीने पदस्थापना दर्शविण्यात आलेल्या पदावर, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास ते विचारात घेऊन उक्त अधिकाऱ्यास पदोन्नतीने पदस्थापना देण्यात यावी.

५. उपरोक्त अधिकाऱ्यास पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी सध्याच्या पदावरून तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

प्रत,

- महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
- मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
- मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
- अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
- पोलीस आयुक्त, मुंबई,
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
- निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
- संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
- निवडनस्ती, कार्यासन पोल-१(अ).